**राज्यातील खाजगी विद्यापीठांच्या स्थापनेशी संबंधित निकषांचा अभ्यास करण्यासाठी समितीची नियुक्ती करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**

**शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण-२०२५/ ई-१५४९०५२/विशि-४**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग

मंत्रालय, मुंबई : ४०००३२.

दिनांक : १४ ऑगस्ट, २०२६.

**वाचा :-** १) शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१७/(१४४/१७)/विशि-४,दिनांक १९ जानेवारी, २०१९.

२) महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०२३.

३) महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) नियम, २०२४.

४) शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०२५/ ई-१५४९०५२/विशि-४, दिनांक २८ एप्रिल, २०२६.

**प्रस्तावना:-**

राज्यातील उच्च शिक्षणाचा विकास व अभिवृद्धी करण्याच्या अनुषंगाने खाजगी विद्यापीठांची स्थापना करण्यासाठी महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०२३ पारित करण्यात आला. सदर अधिनियमाखालील महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) नियम, २०२४ विहित करण्यात आले आहेत. तसेच विद्यापीठ स्थापनेसाठी प्रायोजक मंडळांनी सादर केलेल्या प्रस्तावांची छाननी करण्यासाठी मार्गदर्शक तत्वे दिनांक १९ जानेवारी, २०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आली आहेत. त्यानुसार नवीन खाजगी विद्यापीठ स्थापन करताना आवश्यक जमीन, दाननिधी, नॅक मुल्यांकन, इमारत व इतर पायाभूत सुविधा इत्यादी निकषांची तपासणी केली जाते. असे असले तरी सदर निकषांमध्ये काही कमतरता/त्रुटी निदर्शनास आल्या असून, त्यामध्ये काळानुरुप सुधारणा करणे क्रमप्राप्त ठरले आहे.

उपरोक्त पार्श्वभूमीवर खाजगी विद्यापीठ स्थापनेच्या अनुषंगाने अस्तित्वात असलेल्या निकषांचा अभ्यास करुन त्यात आवश्यक त्या सुधारणा करण्याच्या अनुषंगाने शासनास शिफारस करण्यासाठी समिती स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

उपरोक्त वाचा क्र. ४ येथील शासन निर्णय अधिक्रमित करुन राज्यात खाजगी विद्यापीठे स्थापन करण्यासंबंधी सध्याच्या असलेल्या निकषांचा अभ्यास करुन त्यात आवश्यक त्या सुधारणा करण्याच्या अनुषंगाने शासनास शिफारस करण्यासाठी पुढीलप्रमाणे समिती स्थापन करण्यात येत आहे:-

**१. समितीची रचना:**

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | डॉ. भूषण पटवर्धन, कुलपती, डेक्कन कॉलेज पदव्युत्तर आणि संशोधन संस्था (अभिमत विद्यापीठ), पुणे (माजी उपाध्यक्ष, विद्यापीठ अनुदान आयोग) | अध्यक्ष |
| २ | डॉ. नितीन करमळकर, माजी कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे | सदस्य |
| ३ | सह/उप सचिव (विद्यापीठ शिक्षण), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| ४ | संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई | सदस्य |
| ५ | संचालक,कला संचालनालय, मुंबई | सदस्य |
| ६ | संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे | सदस्य सचिव |

**२. समितीची कार्यकक्षा:-**

राज्यातील खाजगी विद्यापीठांच्या स्थापनेशी संबंधित सध्याच्या निकषांचा अभ्यास करून त्यात आवश्यक त्या सुधारणा करण्याच्या अनुषंगाने शासनास शिफारस करणे. त्यामध्ये प्रामुख्याने पुढील बाबींचा समावेश असेल:-

**(१) <u>पायाभूत सुविधा:</u>**

- जमीन, इमारत बांधकाम, प्रयोगशाळा, ग्रंथालय, डिजिटल सुविधा, वसतिगृह, क्रीडा सुविधा, दिव्यांगांसाठी सुलभता इत्यादी निकष.

**<u>(२) शैक्षणिक गुणवत्ता:</u>**

- प्रस्तावित अभ्यासक्रम चालविण्याचा संस्थेचा अनुभव, भविष्यातील शैक्षणिक गरजा, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची दिशा, जागतिक स्पर्धात्मकता आणि विद्यार्थ्यांच्या हिताचा सखोल विचार करून खाजगी विद्यापीठासाठी शैक्षणिक संस्थेचा आवश्यक किमान शैक्षणिक अनुभव/कामगिरी

- संस्थेकडून चालविण्यात येणा-या महाविद्यालयांचे NAAC accreditation, NBA / NIRF ranking इत्यादी गुणवत्ताविषयक किमान निकष
- संस्थेचा स्वायत्त महाविद्यालये चालविण्याचा अनुभव
- विद्यापीठ अनुदान आयोग (UGC), अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद (AICTE), फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया (PCI), बार कौन्सिल ऑफ इंडिया (BCI) इत्यादी नियामक संस्थांच्या किमान निकषांचे पालन.
- विद्यार्थी-शिक्षक गुणोत्तर (ratio), प्राध्यापकांची पात्रता, संशोधन प्रकाशने, पेटंट व नवोपक्रम.
- डिजिटल शिक्षण व सायबर सुरक्षा.

(३) **अधिनियम, नियम, अधिसूचनांमधील तरतुदी:**

- The University Grants Commission Act, 1956 and University Grants Commission (Establishment of and Maintenance of Standards in Private Universities) Regulations, 2003.
- राष्ट्रीय शिक्षण धोरण (NEP-२०२०)
- वरील अधिनियम/ नियमन/ धोरण विचारात घेऊन महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे अधिनियम (स्थापना व विनियमन), २०२३ अथवा महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) नियम, २०२४ यामध्ये काही सुधारणा करण्याची आवश्यकता आहे का याबाबत उचित शिफारस करणे.

(४) **विद्यार्थी प्रवेश प्रक्रीया, आरक्षण व शुल्क निश्चिती:**

- खाजगी विद्यापीठातील अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया, शैक्षणिक शुल्क निश्चिती (Admission and Fee Fixation), गुणवत्तेवर आधारित, पारदर्शक व ऑनलाईन प्रवेश प्रणाली, तक्रार निवारण यंत्रणा, प्रवेश प्रक्रियेत राज्य शासन/केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन, शासनाच्या आरक्षण धोरणाची अंमलबजावणी इ. उपरोक्त बाबींबाबत अभ्यास करुन शिफारशी करणे.

(५) **पदभरती :**

- खाजगी विद्यापीठांमधील शिक्षक-शिक्षकेत्तर संवर्गातील पदांच्या पदभरतीबाबत अवलंबिण्यात येणाऱ्या प्रक्रियेचा अभ्यास करुन शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या भरतीतील गुणवत्ता, वेतन, पारदर्शकता व समान संधी यासंबंधी अभ्यास करुन शिफारशी करणे.

(६) **न्यायालयीन निर्देश :**

- खाजगी विद्यापीठांबाबत मा. न्यायालयाकडून वेळोवेळी प्राप्त होणा-या निर्देशांच्या अनुषंगाने उचित शिफारस करणे.

३.	उपरोक्त कार्यकक्षेच्या अनुषंगाने विविध मुद्यांचा सर्वकष विचार करून सदर समिती आपला अहवाल दोन महिन्यांत शासनास सादर करेल.

४.	सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०८१४१३०५२७२७०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

PRATAP PANDURANG LUBAL

Digitally signed by PRATAP PANDURANG LUBAL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT, 2.5.4.20=b0d6763338fc6cc4f7cf07ca60db7abc1cfac99c84ab1b5bfc0dae4609d631d0, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=AF6895C47A84066432F5BDD1F182B4163D880AC9BD8D24A198FD0E7310BBEB59, cn=PRATAP PANDURANG LUBAL
Date: 2026.08.14 13:06:30 +05'30'

**(प्रताप पां. लुबाळ)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

१. मा.मंत्री,उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. डॉ. भुषण पटवर्धन, माजी उपाध्यक्ष, विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली.
५. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६. संचालक, कला संचालनायल, मुंबई.
७. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
८. सर्व सह सचिव/उप सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. महालेखापाल, (लेखा व परिक्षा-१)/(लेखा व अनुज्ञेयता), मुंबई.
१०.संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
११.अवर सचिव, अर्थसंकल्प शाखा, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२.कक्ष अधिकारी, रोख शाखा, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३.कक्ष अधिकारी (मशि-४), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४.निवडनस्ती.